# इचलकरंजी महानगरपालिका,इचलकरंजी.

(जिल्हा- कोल्हापूर)

कार्यालय - महानगरपालिका कार्यालय,इचलकरंजी.

फोन नं.- ०२३० २४२१४५१ ते २४२१४५५

EMAIL: ichalkaranjinp@gmail.com


जा. क्र. इमपा/आस्था.व सा.प्र.वि./ ०७/८५३ /२०२५.

दिनांक : २९.१०.२०२५

## नियुक्ती पत्र

विषय - म.न.पा.आस्थापनेवरील विविध पदांवर कंत्राटी पद्धतीने नियुक्तीबाबत.

संदर्भ - मा. प्रशासक ठराव क्र. ५९/२०२५ (मा.महासभा), दिनांक २५.०९.२०२५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (३) व ५४ च्या तरतुदीनुसार म.न.पा.आस्थापनेवरील मंजूर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) ०६, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) ०१, कनिष्ठ अभियंता (Software) ०१, कनिष्ठ अभियंता (हार्डवेअर व नेटवर्क) ०१ आणि पशुशल्यचिकित्सक ०१ याप्रमाणे अर्हताधारक उमेदवारांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता दिनांक २६ व २८.०८.२०२५ रोजी Walk in Interview प्रक्रिया मा.अति.आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील निवड समितीमार्फत पूर्ण करण्यात आली आहे.

उपरोक्त निवड समितीच्या शिफारसीनुसार खाली नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांची, त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या पदाचे कामकाजाकरिता, संबंधित उमेदवारांचे रुजू दिनांकापासून सहा महिने मुदतीकरिता उपरोक्त संदर्भिय मा.प्रशासकीय ठरावान्वये प्राप्त मान्यतेस अनुसरून कंत्राटी पद्धतीने मानधनावर नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पदनाम | कामकाजाचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रवी वसंत कांबळे | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| २ | संकेत शशिकांत कोळी | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| ३ | प्रथमेश शीतल मगदूम | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| ४ | अक्षय रामप्रभू चोरे | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| ५ | तेजश्री संजय वाघमारे | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| ६ | ओंकार भीमराव माने | स्थापत्य अभियंता | बांधकाम विभाग |
| ७ | योगेश सुनील सुतार | स्थापत्य अभियंता | पाणीपुरवठा विभाग |
| ९ | अजिंक्य अनिल मोहिते | यांत्रिकी अभियंता | पाणीपुरवठा विभाग |
| १० | फजल खालील मोमीन | कनिष्ठ अभियंता (Software & Programmer) | संगणक विभाग |
| ११ | मयूर संजय शिंदे | कनिष्ठ अभियंता (Hardware & Network) | संगणक विभाग |

सदर नियुक्ती खालील अटी / शर्तीस अधीन राहून करण्यात येत आहे.

१) कंत्राटी पद्धतीने देण्यात आलेली नियुक्ती ही सहा महिने कालावधीसाठी असेल आणि या मुदतीत कामकाजाचे मूल्यमापन करून कामकाज समाधानकारक असेल तर आणि आवश्यकतेनुसार पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येईल आणि यासंबंधी मा. आयुक्त यांचे निर्णय अंतिम असतील.

२) कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास म.न.पा. / शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल, तसेच यासाठी कोणताही दावा / वाद निर्माण करता येणार नाही.

३) मा.आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार असतील.

४) सोपविण्यात आलेले कामकाज / सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात संबंधित उमेदवार गुंतलेला असणार नाही किंवा त्याचे कोणतेही हितसंबंध असणार नाहीत.

५) कोणतेही Conflict of Interest ( हितसंबंध) असल्यास ते जाहीर करण्याची उमेदवाराची जबाबदारी असेल.

६) सोपविण्यात आलेल्या कामकाजाशी संबंधित प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत पूर्णत: गोपनीयता पाळण्याची व सोपविण्यात आलेले कामकाज निश्चित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. तसेच कामकाजाबाबत, नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

७) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने मासिक रक्कम रु. २६२७२/- इतके मानधन देय असेल.

८) वरीलपैकी कोणत्याही अटी / शर्तींचा भंग झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल. त्यामुळे उक्त कोणत्याही अटी / शर्तींचा भंग होणार नाही याची दक्षता संबंधित उमेदवाराने घ्यावयाची आहे.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

Digitally signed by
Rahul Sarjerao Mardhekar
Date: 29-10-2025
14:15:17

(राहुल मर्ढेकर)
प्र. अति. आयुक्त,
इचलकरंजी महानगरपालिका.

प्रति,
वरील संबंधिताना

/- प्रस्तुतचे नियुक्ती पत्र मिळाले दिनांकापासून सात दिवसांचे आत, नांवापुढील रकाना क्र. ४ मध्ये नमूद विभागाकडे रुजू होवून संबंधित विभागप्रमुख यांचेमार्फत रुजू अहवाल सादर करण्याकरिता तसेच संबंधित विभागप्रमुख यांचेकडे उक्त अटी / शर्ती मान्य असल्याबाबत विहित किमतीच्या मुद्रांकावर बंधपत्र लिहून देण्याकरिता . .

**प्रत -**
शहर अभियंता,
प्र.कार्यकारी अभियंता,
संगणक विभागप्रमुख,

/- यांना, वरील संबंधिताना रुजू करून घेवून, त्यांचेकडून उक्त अटी / शर्ती मान्य असल्याबाबत विहित किमतीच्या मुद्रांकावर बंधपत्र लिहून घेणे तसेच संबंधितांचे मासिक मानधन पत्रक तयार करणे आणि आवश्यकतेनुसार EPF संदर्भातील तरतुदींचे पालन करणेकरिता . .

**प्रत माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी —**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
मुख्य लेखापरीक्षक,
निवड नस्ती ( आस्था. व सा.प्र.विभाग)

**प्रत माहितीस्तव सादर —**
मा. आयुक्त तथा प्रशासक,
मा. अति. आयुक्त
उपायुक्त (सर्व)

नोट : नियुक्ती झालेल्या उमेदवारांनी आस्थापना / व सामान्य प्रशासन विभागाशी संपर्क साधून नियुक्ती पत्र प्राप्त करून घ्यावे